आदरणीय स्व.पी. डी. पाटीलसाहेब यांच्या पुण्यतिथीनिमित्त वेणूताई चव्हाण कॉलेजमध्ये  विविध कार्यक्रम संपन्न

कराड :(दि. 15, प्रतिनिधी) श्री शिवाजी शिक्षण संस्था, कराडच्या उच्च शिक्षण मंडळ, कराडचे वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड मध्ये  आदरणीय पी. डी. पाटीलसाहेब यांच्या सोळाव्या पुण्यस्मरण दिनानिमित्त सकाळी आदरणीय पी. डी. पाटीलसाहेब यांच्या  प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर भाषा वाङ्मय  मंडळ आणि IQAC यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागर कर्तृत्वाचा: कराड नगरीचे शिल्पकार आदरणीय पी. डी. पाटीलसाहेब' या कार्यक्रमाचे आयोजन केले.  याप्रसंगी आदरणीय स्व. पी.डी. पाटील साहेब यांच्या जीवनावर  हर्षवर्धन भोसले या विद्यार्थ्याने तयार  केलेल्या भित्तिपत्रकाचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर प्राचार्य डॉ.एस आर सरोदे, जिमखाना उपाध्यक्ष डॉ. आर आर थोरात,  उपप्राचार्य प्रा. आर ए कांबळे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी,  प्रा बोंगाळे व प्रा पवार, सुपरवायझर मधाळे मॅडम , IQAC समन्वयक डॉ. जे.  यु.  दीक्षित उपस्थित होते. जागर कर्तुत्वाचा या कार्यक्रमांतर्गत आदरणीय पी डी पाटीलसाहेब यांच्या जीवन प्रवासावरील प्राचार्य अ रे डिसूझा यांनी संपादित केलेल्या सेतू या स्मृतिग्रंथाचा परिचय प्रा. श्री एस एस बोंगाळे यांनी करून दिला. त्यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थी दुर्वा पवार, अंकुश जाधव, सुदर्शन वर्दे, वैष्णवी पवार, सुरज पाटील, अंजली पानसे, स्वाती लोके, लक्ष्मण भालेकर, यासीन शेख, अनिकेत जाधव, वैष्णवी धोत्रे, चंदना मोरे, निशा जंगम, संचिता नलवडे इत्यादी  वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील विद्यार्थ्यांनी सेतु स्मृतिग्रंथातिल परिच्छेदांचे वाचन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.एस.आर.सरोदे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार डॉ. डी. पी. जाधव यांनी मानले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.तसेच प्लेसमेंट सेल, व्यवसाय व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन समितीच्या वतीने'चालू घडामोडी व सर्वसामान्य ज्ञान परीक्षा' ऑनलाइन पद्धतीने घेण्यात आली.